प्रस्तावना

**विषय:- प्रभाग समिती क्र. 3 अतंर्गत पथदिव्यांच्या व्यवस्थेमध्ये एल.ई.डी. दिवे वगळून पथदिवे व्यवस्थे मधील पायाभूत सुविधा कामांची उदा. पोल, केबल, आर्थिंग, वायर इत्यादि बाबींची वार्षिक निगा व दुरूस्ती करणे.**

**मे सादर,**

महानगरपालिकेने पथदिव्यांच्या राष्ट्रीय कार्यक्रमा अतंर्गत (S.L.N.P.) एल.ई.डी. दिवे बसविणे प्रकल्प् शासन निर्णय क्रमां संकीर्ण-2017/प्र.क्र.183/नवि-20 दिनांक 12/01/2018 व शासन निर्ण क्र. 2017/प्र.क्र./183 नवि-20, दिनांक 04/06/2018 नुसार च्या प्रस्तावांस महासभा ठराव क्र.78 दिनांक 12/07/2018 नुसार ऐनर्जी ऐफिशियंन्सी सर्व्हीसेस लिमिटेड या केंद्रशासनाच्या कंपनी बरोबर 7 वर्ष मुदतीचा करारनामा करण्यात आलेला असून त्यानुसार एल.ई.डी. दिवे निगा दुरूस्ती केली जात आहे.

पथदिव्यांच्या व्यवस्थेमधील एल.ई.डी. दिवे वगळुन पोल, केबल, पॅनल, आर्थिंग, खोदकाम, फाऊंडेशन, पोल फाऊंडेशन इत्यादी इतर साहित्यांची निगा व दुरूस्ती महानगरपालिका प्रभाग निहाय निविदा मागवुन करत आहे. सन 2022-23 करिता मंजुर निविदांची मुदत जुन 2023 मध्ये संपत असुन माहे जुलै ते मार्च 2024 पर्यंत सन 2023-24 करिता प्रभाग निहाय निविदा मागविणेबाबतच्या प्रस्तावास मा.आयुक्त् सो. यांनी मान्यता दिलेली असुन, ठराव क्र. 124 दिनांक 16/03/2023 प्रशासकिय मान्यता आहे. त्यानुसार मागविण्यात आलेल्या निविदा पुढीलप्रमाणे

**कामाचे नाव** :- प्रभाग समिती क्र.3 अतंर्गत एल.ई.डी. दिवे वगळून पथदिवे व्यवस्थे मधील पायाभूत सुविधा कामांची उदा. पोंल, केबल, आर्थिंग, वायर इत्यादी बाबींची निगा व दुरुस्ती करणे.

**अंदाजपत्रकीय खर्च रुपये 41,35,134/-**

वरिल कामांसाठी प्रथम निविदा सुचना क्रमांक 1 दिनांक 18/04/2023 ते 05/05/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असता प्रथम निविदा सुचने अंती 4 निविदा प्राप्त् झाल्या आहेत. 3 निविदाकार यांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार कागदपत्राची पुर्तता न केल्याने 3 निविदा अपात्र होत असून एकच (1) निविदा पात्र होत असल्याने फेर निविदा सुचना क्रमांक 3 दिनांक 02/06/2023 ते 12/06/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असता प्रथम फेर ई निविदा सुचने अंती 2 निविदा प्राप्त् झाल्या आहेत. 2 निविदाकार यांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार कागदपत्राची पुर्तता केली नसल्याने अपात्र होत असल्याने व्दितीय फेर निविदा सुचना क्रमांक 9 दिनांक 04/07/2023 ते 10/07/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आली असून दोन्ही (2) निविदाकार यांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार कागदपत्राची पुर्तता केली असल्याने पात्र होत आहे. तरी 2 पात्र निविदाकार यांच्या निविदा उघडण्यात आलेल्या असून निविदा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **अ.क** | **ठेकेदाराचे नाव** | **निविदा दर टक्केवारीत** | **प्राप्त् निविदा रक्कम** |
|---|---|---|---|
| 1 | मे.लाटे इलेक्ट्रिकल्स् कॉन्ट्रक्टर,वेधेपाडा,वजेश्वरी,भिवंडी | अंदाजीत रक्कमे पेक्षा 26 %कमी दराने | 30,59,999/- |
| 2 | मे. एस.एन.इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड इंजिनीअरींग, भिवंडी | अंदाजीत रक्कमे पेक्षा 27.201 %कमी दराने | 30,10,336/- |

वरिल प्रमाणे सर्वात कमी दराची **मे. एस.एन.इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड इंजिनीअरींग,भिवंडी** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.201 टक्के कमी दराची व रक्कम रुपये 30,10,336/- खर्चाची निविदा प्राप्त् झालेली आहे. शासन निर्णय, क्रमांक: सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27/09/2018 नुसार

देकार 15 टक्के पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम अतिरीक्त् सुरक्षा ठेव जमा करणे अनिवार्य आहे. तरी शासन निर्णयातिल तरतूदीनुसार सर्वात कमी दराचे निविदाकार मे. एस.एन.इलेक्ट्रिकल्स ॲण्ड इंजिनीअरींग,भिवंडी यांनी सदर अतिरीक्त् सुरक्षा ठेव भरणेकामी समंती दर्शविलेली असून सदर रक्कम जमा झाल्यानंतरच कार्यादेश देण्यात येतील. निविदा संविदा करणेकामी सादर केलेला कार्यालयीन अहवाल व त्यावरील कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, मा.अतिरीक्त आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीस मा. आयुक्त् सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा मे. एस.एन.इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड इंजिनीअरींग,भिवंडी यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे तसेच आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक** 286

**दिनांक :-** 26/06/023

**विषय:- प्रभाग समिती क्र. 3 अतंर्गत पथदिव्यांच्या व्यवस्थेमध्ये एल.ई.डी. दिवे वगळून पथदिवे व्यवस्थे मधील पायाभूत सुविधा कामांची उदा. पोल, केबल, आर्थिंग, वायर इत्यादी बाबींची वार्षिक निगा व दुरूस्ती करणे.**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्रक्र 71(भाग-2)नवि-14, दिनांक 06/06/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 अ(1अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त्, भिवडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. 3 मधिल एल.ई.डी. दिवे वगळून पथदिवे व्यवस्थेमधील पायाभूत सुविधा कामांची उदा.पोल, केबल, आर्थिंग, वायर इत्यादी बाबींची वार्षिक निगा व दुरूस्ती करणेकामी वरील प्राप्त् निविदेनुसार प्र.कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी शिफारस केल्यानुसार सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. एस.एन.इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड इंजिनीअरींग,भिवंडी** यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे व त्यानुसारं येणाऱ्या रक्कम रुपये 30,10,336/- चे खर्चास आर्थिक मान्यता देत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त्**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**